अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०४/०२/२०२६

## —: **प्रेसनोट** :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०२/२०२६ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | १) श्रीमती कविता निलेश धनावडे, ४८ वर्षे, पद- अनुज्ञापन निरीक्षक,<br>जी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| आरोपी लोकसेवक **(अटक नाही)** | २) श्री.सय्यद सरफुद्दीन इमाम, वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक,<br>जी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ४०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रू. ३५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे कॅफे शॉपचा ग्लो शाईन बोर्ड अनधिकृत असून रू. १,१९,०००/- फाईन लवकरात लवकर नाही भरला तर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सांगून कायदेशीर कारवाई न करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक कविता धनावडे व सय्यद इमाम यांनी रू. ४०,०००/- लाचेची मागणी केली व दिनांक ०२/०२/२०२६ रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०२/०२/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०२/०२/२०२६ व ०३/०२/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे कायदेशीर कारवाई न करण्याकरीता रू. ४०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ३५,०००/- लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ०३/०२/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक कविता धनावडे यांना तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम रू. ३५,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर लोकसेवक कविता धनावडे यांनी लोकसेवक सय्यद इमाम यांना कॉल करून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सांगितले असता, त्यांनी त्यास संमती दर्शवली. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :-** **श्रीमती माधुरी माने, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. निलेश पाटील, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शक अधिकारी :- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सत्यमेव जयते
बृहन्मुंबई

( अजित सुर्वे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
वेबसाईट :- **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
फेसबुक :- **www.facebook.com - Maharashtra ACB**